लोकमत

# महावितरण जाहीर सुचना

औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतुन वीजतंत्री/तारतंत्री व कोपा या व्यवसायात राष्ट्रीय व्यवसाय प्रशिक्षण परिषद (NCVT) उत्तीर्ण उमेदवारांना सुचित करण्यात येते कि. महावितरण नागपूर ग्रामिण मंडल अंतर्गत सन 2025-26 करिता शिकाऊ उमेदवारांना एक वर्ष कालावधीसाठी करारबध्द करण्यात येणार आहे. पात्र उमेदवारांनी http://www.apprenticeshipindia.org या संकेतस्थळावर शिकाऊ उमेदवारी करिता दिनांक 09.09.2025 (00.00 तासापासुन) ते दिनांक 15.09.2025 (24.00 तासापर्यंत) विभाग निहाय आस्थापना नोंदणी क्रमांकावर online अर्ज करावे. नागपूर ग्रामिण मंडल, नागपूर अंतर्गत असणाऱ्या विभागाचे आस्थापना नोंदणी क्रमांक खालील प्रमाणे आहे.

| अ. क्र. | विभागाचे नांव | आस्थापना नोंदणी क्रमांक | कोपा | वीजतंत्री | तारतंत्री |
|---|---|---|---|---|---|
| 1 | नागपूर ग्रामिण मंडल, नागपूर | E10162702301 | 18 | — | — |
| 2 | काटोल विभाग | E05202700171 | 06 | 32 | 20 |
| 3 | मौदा विभाग | E12172700132 | 06 | 21 | 14 |
| 4 | सावनेर विभाग | E01182700026 | 03 | 41 | 11 |
| 5 | उमरेड विभाग | E12172700189 | 02 | 15 | 15 |

1) **शैक्षणिक अर्हता -** 1) महाराष्ट्र राज्य माध्यमिक शालांत परिक्षा उत्तीर्ण, 2) राष्ट्रीय व्यवसाय प्रशिक्षण परिषद (NCVT) नवी दिल्ली मान्यता प्राप्त औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतुन वीजतंत्री/तारतंत्री/कोपा या व्यवसायात परीक्षा उत्तीर्ण.

2) **शैक्षणिक दस्ताऐवज** - 1) एस.एस.सी. व आय.टी.आय. वीजतंत्री/तारतंत्री चार सेमिस्टर व कोपा या व्यवसायातील दोन सेमिस्टरची उत्तीर्ण गुणपत्रिकाची मूळप्रत, 2) आधारकार्ड व मागासवर्गीय विद्यार्थ्यांचे जात प्रमाणपत्र व रहिवासी प्रमाणपत्र व इतर सर्व अनुषंघीक आवश्यक कागदपत्रांची मूळप्रत उमेदवारांने स्वतः च्या प्रोफाईलवर स्कॅन करुन अपलोड करावे.

3) **विद्यावेतन -** प्रचलित नियमाप्रमाणे लागू राहिल.

4) **वयोमर्यादा -** दिनांक 31.08.2025 पर्यंत 18 ते 32 वर्ष व मागासवर्गीयांसाठी 05 वर्ष शिथील राहील. वरील शैक्षणिक अर्हता धारण केलेल्या उमेदवाराची नोंदणी ग्राह्य धरल्या जाईल. 5) नमुद पद संख्या कमी जास्त करण्याचे व भरती प्रक्रियेशी निगडीत असलेले सर्व अधिकार व्यवस्थापन राखुन ठेवीत आहे व सदरचा निर्णय कोणत्याही प्रकारे उमेदवारांस कळविल्या जाणार नाही. 6) भरती प्रक्रिये दरम्यान उमेदवाराने राजकीय किंवा इतर अधिकाऱ्यांकडुन दबाव आणल्यास आपली उमेदवारी रद्द करण्यात येईल. 7) वरील कालावधीत ऑनलाईन (Online) अर्ज सादर न केल्यास अशा अर्जाचा विचार केला जाणार नाही. 8) शिकाऊ उमेदवारांची निवड ही एस.एस.सी व आय.टी.आय गुणांच्या टक्केवारीनुसार (अनुक्रमे 40 व 60 टक्के) अटी व शर्तीच्या अधिन राहून प्रवर्गनिहाय निवड केली जाईल. 9) शासन निर्णया नुसार अनुसुचित जाती करिता 1:10 व अनुसुचित जमाती करिता 1:11 प्रमाणानुसार पदे राखीव व महिलांकरिता शासन निर्णयनुसार पदे राखीव राहतील. 10) तसेच उमेदवारांनी संकेतस्थळावर Online Registration ची नोंदणी केल्याची प्रत (www.apprenticeshipindia.org) व शैक्षणिक अर्हता धारण केलेल्या गुणपत्रिका प्रमाणपत्राची साक्षांकित केलेली छायांकित प्रतीसह आपला अर्ज दिनांक 16.09.2025 ते 19.09.2025 पर्यंत संबंधीत कार्यालयास कामकाजाचे दिवशी सादर करावे व जे उमेदवार आपले संपूर्ण दस्ताऐवजसह संबंधित कार्यालयास अर्ज सादर करणार नाहीत. त्या उमेदवारांचा प्रशिक्षणा करिता निवड करण्याबायत विचार करण्यात येणार नाही. 11) तसेच विभागाच्या कार्यक्षेत्रांतर्गत रहीवासी असलेलेच उमेदवारांचे अर्ज संबंधीत विभागाकरिता ग्राह्य धरण्यात येईल याची नोंद घ्यावी. 12) ज्या शिकाऊ उमेदवारांनी वीजतंत्री/तारतंत्री/कोपा व्यवसायात या पुर्वी प्रशिक्षण घेतले असल्यास अशा उमेदवारांनी प्रशिक्षणाकरिता अर्ज करु नये.

अधीक्षक अभियंता,
नागपूर ग्रामीण मंडल, महावितरण, नागपूर

NZ/PR/ No.109/2025 Dt. 04.09.2025